# समग्र सर्वस्पर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर



संपादक
डॉ. ओमप्रकाश सा. बोबडे

# समग्र सर्वस्पर्शी :
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

संपादक

**डॉ. ओमप्रकाश सा. बोबडे**

इतिहास विभाग प्रमुख

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,

अमरावती

**प्रकाशक**

प्राचार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,

अमरावती

# समग्र सर्वस्पर्शी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर


♦ संपादक : **डॉ. ओमप्रकाश बोबडे**


०२, स्नेह रेसिडेन्सी, मनोर मांगल्य मागे,
जुना बायपास, अमरावती, महाराष्ट्र
मो. ९८६०८८२४५६
Email : omprakashbobade@gmail.com


♦ प्रकाशक : **प्राचार्य,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
अमरावती

♦ आवृत्ती : **प्रथम**

♦ प्रकाशन तारीख : **६-१२-२०२३**

♦ ISBN : 978-81-948833-2-6


♦ © : **सर्व हक्क संपादकाच्या अधीन**


♦ अक्षर जुळवणी : **श्री गजानन ढोले**

♦ मुखपृष्ठ : **श्री मनिष चोपडे**

♦ मुद्रक : **अथर्व ग्रॉफिक्स, अमरावती**

♦ किंमत : **रु. २००**


---


सर्व हक्क सुरक्षित, या पुस्तकातील मजकुरातून / चित्रातून व्यक्त झालेल्या विचारांशी / प्रकाशक / मुद्रक सहमत असेलच असे नाही. कुठलाही वाद अमरावती न्याय क्षेत्रांतर्गत राहील.

# अनुक्रमणिका


| अ.क्र | तपशील | नं. |
|---|---|---|
| १) | **कामगारांचे कैवारी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर**<br>डॉ. राजू भा. खरडे | १ |
| २) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार**<br>प्रा. डॉ. महेश गोमासे | ६ |
| ३) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक विचार व कामगिरी**<br>प्रा. डॉ. विजया साखरे | १० |
| ४) | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टिकोन**<br>डॉ. जगदीश द. हेंडवे | २१ |
| ५) | **डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व आजची शिक्षण व्यवस्था**<br>डॉ. सुभाष रा. रगडे | २८ |
| ६) | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार**<br>प्रा.वडितके शंकर गोरक्ष | ३९ |
| ७) | **लोकशाहीचा पाया म्हणजेच डॉ. आंबेडकरांचे संविधान**<br>प्रा. डॉ. रवींद्र पुंडलिक झनके | ४२ |
| ८) | **बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राज्य समाजवाद**<br>प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा | ४८ |
| ९) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सत्याग्रह**<br>प्रा. डॉ. सौ. रूपाली गोवर्धन दिकोंडा | ५३ |
| १०) | **बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार**<br>डॉ. कविता एन. मालोकार (हिरुळकर) | ५९ |
| ११) | **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धार्मिक विचार**<br>अे. बी. वरघट | ६७ |
| १२) | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार**<br>प्रा. डॉ. मंजुषा ह. धापुडकर | ७५ |

# बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**डॉ. कविता एन. मालोकार (हिरुळकर)**
प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी,
जि. अमरावती - ४४४७०५

डॉ. भीमराव रामजी तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तेजस्वी व विजयी जीवनयात्रा म्हणजे एका जन्मजात, स्वयंभू, बुद्धिमान, कर्तृत्ववान आणि थोर विचारवंत अशा महामानवाची जनकल्याणकारी, राष्ट्रहितकारी, अवघ्या मानवतेच्या भल्याची, निस्वार्थ त्यागाची आणि सार्थक समर्पणाची जीवनयात्रा होती. ते अखेरपर्यंत आपल्या जीवितकार्यात मनापासून रममाण होते. म्हणूनच डॉ. आंबेडकरांना अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठाने एलएल.डी. ही सन्माननीय पदवी देऊन गौरविले; भारतातील हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठाने डी. लिट. ही सन्मानाची पदवी देऊन गौरविले आणि भारत सरकारने 'भारतरत्न' हा सर्वश्रेष्ठ पुरस्कार मरणोत्तर देऊन गौरविले. खरोखर, डॉ. भीमराव रामजी तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वार्थाने महामानवच होते!

भारतीय लोकशाही जर सशक्त करायची असेल तर भारतीय जनता शिक्षीत असणे गरजेचे आहे. कारण प्रखर असा विरोधी पक्ष आणि सुशिक्षित मतदार यामुळे भारतीय लोकशाही यशस्वी होवू शकेल. अन्यथा लोकशाहीत बहूमताला प्राधान्य असते आणि शिक्षणाच्या अभावामुळे अज्ञानी लोकांने शासन निर्माण होईल असे बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाविषयी म्हणत असत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म महू गावी १४ एप्रील १९८१ रोजी झाला. त्याचे वडील सैन्यात होते. समाज सुधारणेची आणि दलितांचा उद्धार करण्यासाठी प्रेरणा बाबासाहेबाना त्याच्या वडीलांकडून मिळाली. रत्नागिरीतील दापोली जिल्ह्यातील प्राथमिक व सरकारी शाळेत त्यांचे माध्यमिक शिक्षण पूर्ण झाले. अनेक अपमानकारक प्रसंगांना या शैक्षणिक कालखंडापासून तोंड द्यावे लागल्यामुळे जन्मनिष्ठ विषमतेवर आधारलेल्या समाज व्यवस्थेबद्दल चिड त्यांच्या मनात निर्माण झाली. १९९३ साली ते पदवीधर झाले. सयाजीराव गायकवाड यांच्या आग्रहास्तव त्यांनी संस्थाची सेवा पत्करली. तरी ऑफिसमध्ये व ऑफिससमोर त्यांना सन्मानाची वागणूक मिळत नव्हती. त्यानंतर बाबासाहेब अमेरिकेत गेले. त्यांनी तेथे कोलंबिया विद्यापीठात अध्ययन केले. एम.ए. ची पदवी मिळवून नंतर लडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेत प्रविष्ट झाले. पण तेथील अभ्यासक्रम पूर्ण न करताच त्यांना मायदेशी परत यावे लागले. उच्च शिक्षणाने विभूषित असुनही त्याच्या वाट्याला सामाजिक प्रतिष्ठा, समतेची वागणूक कधीच आली नाही. १९१८ साली मुंबईच्या एका महाविद्यालयात ते अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. अर्थशास्त्र विषयातील एम. एस्सी., डी.एस्सी. या सर्वश्रेष्ठ पदव्या त्यांना बहाल करण्यात आल्या. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री होण्याचा मान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मिळाला. त्यांनी आपल्या वैयक्तिक धकाधकीच्या कार्यात सुद्धा देशहिताच्या कार्याकडे दुर्लक्ष केले नाही. घटनेच्या कार्याचा मसुदा तयार करतांना त्याच्यावर ज्या टिका झाल्यात त्यांना सडेतोड उत्तर बाबासाहेबांनी दिलीत. घटना समितीला मार्गदर्शन करताना डॉ. आंबेडकरांनी आपल्या सखोल अध्ययनाचा व प्रज्ञावंत व्यासंगाचा प्रत्यय सर्वांनाच आणून दिला. अशा थोर विचारवंताच्या शिक्षणाविषयक विचारांचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्याचे अवलोकन केले असता ते विविध अंगानी फुललेले दिसून येते. त्यांच्या जीवन कार्याचा जर एका अंगाचा जरी अभ्यास करतो म्हटले तर एक प्रबंध पुर्णत्वास जावू शकतो. त्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय घटनाविषयक इ. विषयावर सखोल आणि अभ्यासपुर्ण अध्ययन अभ्यासकांना भुरळ पाडताना दिसून येते. बाबासाहेबानी आपल्या आयुष्यात अशक्य वाटणाच्या अनेक बार्बीना आपल्या प्रयत्नानी शक्य करून दाखविले आहे. बाबासाहेब फक्त पुस्तकी पंडीत, राजकीय पुढारी किया विद्वतेचे आव आणणारे व्यक्तीमत्व नव्हते तर त्यांनी प्रत्यक्षात आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली व आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे हत्यार आहे. शिक्षणाने मानसाला कर्तव्य व हक्काची जाणीव होते. हे ओळखून डॉ. बाबासाहेबानी अस्पृश्य समाजाला स्वतःची जाणीव करून देण्यासाठी शिक्षणाचे महत्व पटवून दिले आहे. 'शिक्षण वाघणीचे दूध आहे. ते प्यायल्यावर माणूस गुरगुरायला लागतो' असे त्यानी आपल्या समाजाला कळकळीने समजावून सांगीतले आहे. याचा अर्थ असा शिक्षणाने मनुष्य बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. त्यामुळे तो कोणत्याही विषयावर साधक-बाधक चर्चा करू शकतो. त्याला काय चांगल आणि काय वाईट यातील अंतर समजू लागते, कारण मानसाचा स्वभाव बदलविण्याची क्षमता शिक्षणात आहे. हे समाजबांधवांना त्यांनी ठासून सांगीतले. शिक्षण नसलेल्या माणसाची अवस्था ही आंधळ्यासारखी असते. शिक्षणाचे महत्व, त्याची आवश्यकता ज्या जातीत जन्माला आले होते आणि इतरही जमातीतील अनेक जातींना हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेने शिक्षण घेण्याची संधी नाकारली होती. अलीकडच्या काळात देखील शिक्षण घेताना किती त्रास सहन करावा लागतो. हे आजही आपल्याला पहावयास मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लक्षात एक गोष्ट आवर्जून आली होती ती म्हणजे अडाणी आणि अशिक्षित माणूस मनाने गुलाम होतो. त्यांचा अडाणीपणा त्याना लाचार बनवितो. त्याच्या जीवन जगण्यात न्यूनगंड निर्माण होतो. म्हणून हा सर्व अविचार आणि गुलामगिरी नष्ट करावयाची असेल तर त्यांच्यासाठी प्रथम शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुला केली पाहिजे. अज्ञानमुळे जातीयव्यवस्था बळकट झाली हे सत्य बाबासाहेबांनी आपल्या चिंतनातून स्पष्ट केले आहे.

गौतम बुद्ध, ज्योतीबा फुले आणि कबीर यांचा विचारांचा प्रभाव डॉ. बाबासाहेबांच्या विचारावर दिसून येतो. गौतम बुद्धाने दुःखाचे कारण तृष्णा सांगितले. या तृष्णेचे अज्ञान सांगितले. 'तुम्ही स्वयंप्रकाशित व्हा आणि अज्ञान दूर करा, ज्ञान मिळवा' असेही ते सांगतात. ज्योतीबा फुले विद्येची मौलीकता अतिशय धार्मिक, मार्मिक आणि समर्पक शब्दात सांगतात, 'विद्येविना मती गेली. मती विना निती गेली. निती विना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले. इतके अनर्थ एका अविद्येने केले.'

कबीर म्हणतात, ज्ञानाशिवाय माणूस आंधळा आहे. देव आणि धर्म यांचा हवाला देवून धर्म ग्रंथामधून सांगीतलेली चलाखी आणि त्यामुळे खालच्या जातीतील लोकांना कसे अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले हे जाणून घेण्यासाठी सुधा शिक्षणाचे महत्व त्यांनी प्रतिपादन केले. ज्या समाजाला हजारो वर्षे शिक्षण नाकारण्यात आले. त्या समाजाला बाबासाहेबांनी 'शिका, संघटीत व्हा, आणि संघर्ष करा' असा मौलिक संदेश

दिला. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण क्षेत्रातील अनेक विषयात सर्वोच्च प्राविण्य आणि पदव्या मिळवल्या आहेत.

आपल्याला स्वतंत्र मिळून ६५ वर्षे झाली आहेत. तरी आपल्या खेड्यापाड्यातील शाळांची अवस्था आजही चांगली नाही. खेड्यातील अनेक शाळामध्ये शिक्षक नाही. ज्या ठिकाणी शिक्षक आहेत त्यांच्यावर दोन तीन वर्गाची जबाबदारी एका शिक्षकावर आहे. अनेक शाळा एक शिक्षकी आहेत. त्या खेड्यात त्या शिक्षकाला कोणत्याच सोयी नसतात. राहावयास घर नसते, वेळेवर पगार मिळत नाही. अशा परिस्थितीत शिक्षक विद्यार्थ्यांना मन लावून कसे शिकविल हा गंभीर प्रश्न आहे. आजच्या शैक्षणिक धोरणात सरकारने प्राथमिक शिक्षणावर जास्त भर दिला असला तरी ते धोरण पुर्णपणे अमलात आणण्यासाठी शासनापुढे अनेक अडचणी येत आहेत. या संपूर्ण अडचणीची कल्पना त्या काळात बाबासाहेबांना होती. यावरून त्याच्या कल्पनाशक्तीची आपल्याला कल्पना येवू शकते. यासाठी अनुदानाची आवश्यकता तत्कालीन शिक्षण मंत्र्यांना पटवून देताना त्यांनी म्हटले होते, 'प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत घातली की त्यांचे किंवा तिचे शिक्षण लिहता वाचण्याच्या अवस्थेत राहू नये तर तो संपूर्णपणे सुशिक्षित होवूनच बाहेर पडला पाहिजे व पुढील आयुष्यात सतत शिक्षण तो घेतच राहीला पाहिजे.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सरकारला सांगितले की, 'पहिल्या वर्गात जर शंभर मुले घातली तर त्यापैकी कुणीही मध्येच शिक्षण थांबविता कामा नये, त्यासाठी शासनाने शुल्काचे ओझे त्यांच्यावर पडू नये म्हणून अनुदान मंजुर केले पाहिजे. विद्यार्थ्यांवर जास्त शुल्क आकारले जावू नये कारण जास्त शुल्क आकारल्या गेल्याने शिक्षणाचे व्यापारीकरण होते व शिक्षणाचा दर्जा खालवतो व शिक्षण ही श्रीमताची मक्तेदारी बनते. विना अनुदान तत्वावर चालवणाऱ्या महाविद्यालयातून ज्या मोठ्या प्रमाणात रक्कम वसूल केली जाते त्याचा विरोध झाला पाहिजे. कारण उच्च दर्जाचे आणि व्यावसायिक शिक्षण हे सर्वांनाच मिळाले पाहिजे', असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'अशा समाजाच्या अनुदानाची आखणी केली पाहिजे.'

शिक्षण आणि लोकसंख्या यांचाही संबंध समर्पकपणे बाबासाहेबांनी मांडलेला दिसून येतो. मागासवर्गीयांच्या मुलांना दिली जाणारी शिष्यवृत्ती रक्कम शिक्षणावर खर्च होते की नाही याची शासनाने चौकशी केलीच पाहिजे असेही ते सुचवितात. शिक्षणाच्या उत्तम व्यवस्थेसाठी नियुक्त करण्यात येणारा प्रशासक हा सरकारी नोकरच असावा, असाही

आग्रह त्यांचा होता. कारण तो सरकारी नोकर जर असेल तर कुणाच्याही दडपणाखाली काम करणार नाही. असे प्राथमिक शिक्षणाविषयी सखोल विचार त्यांनी मांडलेले दिसून येते.

राष्ट्रला स्वातंत्र्याची फळे प्रामाणिकपणे चाखू द्यायची असतील तर खरे स्वातंत्र दास्यात खितपत पडलेल्या निम्न वर्गानाच प्राप्त झाले पाहिजे, गरजा, भय, छळ आणि शोषण या सर्वांनाच स्वतंत्र असणारी जनताच स्वातंत्र्याला खरा अर्थ प्राप्त आणून देत असते आणि हे सर्व शिक्षणामुळेच साध्य होते. हे बाबासाहेबानी पटवून दिले. आज हा अम्नवर्ग त्या असहाय व उपेक्षीत अवस्थेत कालक्रमणा करीत आहे. त्यातुनच त्याला योग्य व मोफत शिक्षणाच्या सहयानेच बाहेर काढता येवू शकेल. त्यांना निवांत, सुखी व स्वास्थपुर्ण जीवनाची हमी मिळणेही तितकेच आवश्यक आहे. कारण त्याशिवाय लोकशाही संस्कृतीचा अंगीकार करण्यास त्याना उसंतच मिळणार नाही. कारण या देशाची पारंपारीक समाज रचना लोकशाहीला मुळीच पोषक नाही. कारण त्यातून गरीब-श्रीमंत, उच्च-निच, मालक-मजुर यासारखे स्थाची स्वरुपाचे वर्ण समाजात निर्माण होवून ते टिकून राहतात. त्यात एका अंगाने जुलुम, शोषण, गर्व, लोभ, स्वार्थ वधारतो आणि दुसऱ्याच्या अंगाने असुरक्षितता, दारिद्र्य, अधोगती, आत्मनिर्भरता, स्वावलंबन, प्रतिष्ठा व स्वाभिमान याचा ऱ्हास होत जातो. भारतातील शोषीत जनतेच्या वेदनाबद्दल या समाजाची सद्‌विवेक बुद्धी जागी नसणे हा त्याच्या मते लोकशाहीच्या वाटेतील सर्वात मोठा अडसर आहे. आंबेडकरांनी सर्व नागरीकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या जोरदार पुरस्कार केला आहे. त्याना अभिप्रेत असलेल्या स्वातंत्र केवळ राजकीय नाहीत तर सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि बौद्धिक स्वातंत्र्याची राज्याने प्रत्येक व्यक्तीला हमी द्यायला पाहिजे. असेही विचार आंबेडकरांनी शैक्षणिक विचार व्यक्त केला आहे. बेरोजगारांनी शिक्षणाची कास धरल्याशिवाय त्यांना रोजगाराची प्राप्ती होवू शकणार नाही

डॉ. आंबेडकरांनी परदास्यापेक्षाही वैचारिक दास्य अधिक मुलभूत वाटत असावे आणि त्यामुळेच त्यांना परदास्यमुक्तीपेक्षाही वैचारीक दास्यमुक्तीचे अगत्य अधिक वाटत होते असे दिसून येते. कारण वैचारिक दास्यातूनच अन्य सर्व प्रकारच्या दास्यांचा जन्म होत असतो. एकदा वैचारिक दास्य झुगारून देण्याची ताकद माणसात आली म्हणजे बाकीचे सर्व दास्ये झुगारुन देणे शक्य होते. पण या वैचारिक दास्याला भाकरीचे दास्यही कारणीभूत असते. याचीही जाणीव आंबेडकरांना होती. अभ्यासाच्या सोयीसाठी माणसाने विषयाचे कप्पे पाडले तरी जीवनाचे कप्पे कधीच पडता येत नाही. याचीही जाणीव

मनुष्याला शिक्षणाला शिक्षणाने होते, असेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. स्वातंत्र्योत्तर काळात ज्या शैक्षणिक सवलती मिळू लागल्या त्यामुळे साक्षराची पहिली पिढ़ी काही मागासवर्गीयाच्या घरांत तयार होवू लागली आहे. कित्येकांचे म्हणणे असे आहे की. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा या सवलती द्याव्यात. मागासवर्गीय बहुश: आर्थिक दुबळेच आहे. त्यामुळे मागासपणा आणि आर्थिक दुर्बलता समानच असते असेही बाबासाहेब म्हणतात.

महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाचे स्वरुपाविषयी काही बदल व्हावेत या दृष्टीकोनातून बाबासाहेबांनी अतोनात प्रयत्न केलेत. त्यावेळी विद्यापीठाचे कार्य फक्त परीक्षा घेण्यापुरतेच मर्यादीत होते. जास्तीत जास्त कडक परीक्षा घेणे म्हणजे शिक्षणाचा दर्जा वाढणे असा अर्थ होत नाही तर परीक्षा आणि शैक्षणिक दर्जा हे शिक्षणाचे दोन वेगवेगळे भाग आहेत. मागासवर्गातील विद्यार्थी त्यांच्या परीस्थीतीमुळे सर्वच विषयात एकाच वेळी पास होत असल्यामूळे त्यांच्यासाठी 'कमवा व शिका' ही शिक्षण पद्धत अंमलात आणावी. त्यांना शिक्षण शुल्कामध्ये सवलत द्यावी. त्यांच्या शैक्षणिक दर्जाकडेही लक्ष द्यावे, असेही बाबासाहेब म्हणतात. संशोधन आणि शैक्षणिक दर्जा यात सुधारणा करणे हाच मुख्य उद्देश विद्यापीठाचा असतो. प्राध्यापकांनी शिकविण्यासोबतच संशोधन आणि समाजासाठी चांगली कामे करण्यासाठी वेळ द्यावा जेणेकरून ते समाजातच उच्च शैक्षणिक दर्जा असलेले विद्यार्थी घडवू शकतील.

अभ्यास आणि अध्यापन करण्यासाठी ग्रंथालयाची आवश्यकता आणि महत्व त्यानी प्रतिपादीले. प्रत्येकाचे घरी आपला ग्रंथ संचय असावा हा त्यांच्या आग्रह होता. अध्यापकांनी आपल्या पगारातील काही हिस्सा ग्रंथ खरेदीवर करावा असे ते सांगत होते. त्यांनी या गोष्टी आपल्या आयुष्यात फारच जपल्या. जीवनभर त्यांनी अभ्यासच केला. सर्वोच्च पदव्या व प्राविण्य प्राप्त केले. त्यांच्या ग्रंथसंग्रहात इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, कायदाशास्त्र, धर्मशास्त्र इ. विषयाचे भरपुर ग्रंथ संपदा होती. शिवाय शिल्पकला, वास्तुकला, गणित, भूमिती या विषयाचीही सुद्धा पुस्तके होती. सुमारे पन्नास हजार संचाचा संग्रह सुरक्षित आणि उत्तमरीतीने ठेवण्यासाठी 'राजगृह' ही वास्तू त्यांनी बांधली.

डॉ बाबासाहेबांनी शिक्षणाचे महत्व व त्याची अपरिहार्यता ओळखली होती. म्हणून त्यांनी आपल्या अनुयायांना सर्वप्रथम शिक्षण घेण्याचा सल्ला दिला, जातीयवादाच्या नावाखाली ज्यांना हजारो वर्षापासून शिक्षणाची दारे बंद होती. त्यांना ती उघडी करून देणे भारतीय समाज व्यवस्थेस कठीण होते. गोर गरीब समाजातील

मुला-मुलींना उच्चदर्जाचे चांगले शिक्षण मिळावे म्हणून त्यानी विविध शिक्षण संस्था काढल्या. १९४६ साली त्यांनी 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी शिक्षण संस्था' काढली. मुंबईला 'सिद्धार्थ कॉलेज' तर औरंगाबाद येथे 'मिलिंद कॉलेजची' स्थापना केली. उच्च शिक्षणाचे महत्व सांगत असताना बाबासाहेब सांगतात, 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे महत्व किती आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांना अन्न, वस्त्र, निवारा यांची सोय करून त्यांना गुलाम बनवुन त्यांना उच्च वर्गाची सेवा करायला लावणे हा नसून त्यांच्यातील न्यूनगंड नाहीसा करून त्यांना त्याच्या स्वतःच्या तसेच राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीकोणातून शिक्षणाचे महत्व काय आहे, हे पटवून देणे म्हणजे खरे शिक्षण होय. समाजाच्या सर्वच दुखण्यावर एकच औषध आहे ते म्हणजे शिक्षण.

आज शिक्षण क्षेत्रात नजर टाकली तर सर्व शिक्षणाने झालेले व्यापारीकरण आणि खाजगीकरण दिसून येते. आजची शिक्षण पद्धती आणि शैक्षणिक धोरण शिक्षणापासून जनतेला वंचित करेल काय? अशी भिती वाटते. कारण शिक्षण हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा योग्य वापर झालाच पाहिजे. कारण जो समाज अशिक्षित असतो, तो सर्वस्व गमावलेला असतो. शिक्षणाने माणसात कर्तव्य आणि हक्काची जाणीव निर्माण होते. स्त्री शिक्षित झाली तर ती बालवयातच मुलांवर संस्कार करु शकते. देशाचा उत्तम व प्रामाणिक नागरीक घडविण्यात तिचा फार मोठा वाटा आहे. अशा प्रकारे डॉ बाबासाहेबांनी जीवनात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व दिले आहे. म्हणून शेवटी असे म्हणावे वाटते की, 'भारतात निशस्त्र मार्गानि राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, वैचारिक परिवर्तन म्हणजे संपूर्ण कांती घडवून आणणाऱ्या सर्व सत्याग्रही शक्ती एकवटून कामाला भिडाव्यात, या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहेत.'

आदरणीय वडील रामजी यांनी आपला सुपुत्र असलेल्या लाडक्या व होतकरू भीमरावाच्या मनावर आपल्या ज्ञानाचा सदुपयोग करण्याचा सुसंस्कार व्यवस्थित बिंबवला होता. ते भीमरावाला उपदेश करीत होते, की त्याने मन लावून खूप खूप शिक्षण घ्यावे आणि आपल्या समाजाच्या उद्धारासाठी आपल्या ज्ञानाचा सदुपयोग करून मोठा माणूस व्हावे. आपल्या प्रिय वडिलांच्या उपदेशाप्रमाणे डॉ. भीमराव आंबेडकर यांनी आपल्या समाजाच्या उद्धारासाठी आपल्या ज्ञानाचा सदुपयोग करणे सुरू केले आणि त्यांचे समाजसुधारणेचे आणि धर्मसुधारणेचे महत्कार्य सुरू झाले. त्यासाठी त्यांनी राजकारणाचाही सदुपयोग करणे सुरू केले.

वडील सुभेदार रामजी यांच्या उपदेशाप्रमाणे उच्चविद्याविभूषित व ज्ञानसंपन्न डॉ. भीमराव आंबेडकर यांनी आपल्या समाजाचा उद्धार करण्याचे कार्य सुरू केले. त्यांचा जो आपला समाज होता, तो मूळ महार जातीचा होता. कारण सुभेदार रामजी आणि भीमाबाई हे पती-पत्नी महार जातीचे होते. त्यांचे अपत्य असलेले भीमराव हे देखील महार जातीचेच होते. म्हणून त्यांचा आपला समाज म्हणजे महार जातीचा समाज होता. त्यांना आपल्या जातीच्या समाजाचा उद्धार करावयाचा होता.

परंतु हिंदू समाजात महार जातीच्या समाजाला अस्पृश्य समाज मानले जात होते. हिंदू समाज स्पृश्य आणि अस्पृश्य अशा दोन वर्गांत विभागलेला होता. स्पृश्य समाज अशा जातींचा समूह होता, जो अस्पृश्य वर्गातील जातींच्या स्पर्शाला वर्ज्य मानत होता. महार ही जात अस्पृश्य वर्गाचा म्हणजेच अस्पृश्य समाजाचा एक घटक होती. संपूर्ण अस्पृश्य वर्ग म्हणजेच संपूर्ण अस्पृश्य समाज दीन, दलित, लाचार, अपमानित, उपेक्षित, अन्यायग्रस्त, अत्याचार पीडित, अशिक्षित, कोणतेही काम कमी मोबदल्यात किंवा मोबदल्याविना करणारा आणि स्पृश्य वर्गाच्या दयेवर त्याचे जगणे अवलंबून असणारा होता. संपूर्ण अस्पृश्य समाजाची जी दयनीय अवस्था होती, तीच दयनीय अवस्था महार समाजाची होती. म्हणूनच डॉ. भीमराव आंबेडकर यांना महार जातीच्या समाजाच्या उद्धाराचे जे कार्य करावयाचे होते, तेच त्यांचे कार्य संपूर्ण अस्पृश्य समाजाच्या उद्धाराचे होऊ शकले. त्यांच्या कार्याची व्याप्ती आपोआप वाढली. त्यांनी केवळ महार समाजाच्या उद्धाराला नव्हे, तर संपूर्ण अस्पृश्य समाजाच्या उद्धाराला आपले जीवितकार्य म्हणून स्वीकारले. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याची सुरुवात त्यांच्या अस्पृश्योद्धाराच्या जिवितकार्यापासून झाली. त्यांचे अस्पृश्योद्धाराचे जिवितकार्य संपूर्ण अस्पृश्य समाजाचा उद्धार करणारे होते. हे त्यांच्या जीवितकार्याचे मोठे वैशिष्ट्य होते.

**संदर्भ :**


१) आधुनिक भारतातील राजकीय विचार, डॉ भाष्कर लक्ष्मण भोळे.
२) भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यदुनाथ थत्ते.
३) महाराष्ट्रातील समाजसुधारक संत, साहित्यीक आणि थोर भारतीय विचारवंत, व्ही. एन. स्थायी.
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, खंड ५ संविधान, डॉ. धनराज डाहाट.
५) लोकराज्य मासिक, एप्रील-मे २००४.
६) डॉ. आंबेडकर, जीवन और मिशन, एल आर बाली.
७) घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, किशोर गायकवाड.
८) महामानव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, डॉ. ज्ञानराज काशिनाथ गायकवाड